महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id: mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/ ९४२६
दिनांक : २४/०३/२०२१

# आदेश

विषय:- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश-लॉकडाऊन टप्प्याटप्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत ( मिशन बिगिन अगेन)
होळी/ धूलिवंदन किंवा रंगपंचमी सण / उत्सव साजरी करणेबाबत आदेश / मार्गदर्शक सूचना.

संदर्भ:-

१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७
४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दिनांक १७ एप्रिल २०२०,२१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०,३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २३ ऑक्टोबर २०२०,३ नोव्हेंबर२०२०, १४ नोव्हेंबर२०२०,२३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०,२१ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर२०२०, १४ जानेवारी २०२१, , १० फेब्रुवारी २०२१,१५ मार्च २०२१,१७ मार्च २०२१
५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०,२९३४,दि.०३.०८.२०२०, ३७९१,दि.०२.०९.२०२०, ४६१५,दि.०१.१०.२०२०, ४८२३,दि.०९.१०.२०२०, ४८७४,दि.१३.१०.२०२०, ५१३५,दि.२१.१०.२०२०, ५१९६,दि.२४.१०.२०२०, ५३४२,दि.२९.१०.२०२०, ५३४५,दि.३१.१०.२०२०, ५४६७,दि.०५.११.२०२०, ५६४३,दि.१९.११.२०२०, ५९४७,दि.०१.१२.२०२०, ६६०८,दि.२२.१२.२०२०, ६८३८,दि.३१.१२.२०२०, ७१३९,दि.११.०१.२०२१, ७३५५,दि.१६.०१.२०२१, ७४५८,दि.२०.०१.२०२१, ७५४७,दि.२२.०१.२०२१, ७५७४,दि.२२.०१.२०२१, ७७८५,दि.०१.०२.२०२१, ८०२१, दि.०९.०२.२०२१,८२७४,दि.१८.०२.२०२१, ८३०८,दि.२१.०२.२०२१, ८५७७, दि.२८.०२.२०२१, ९०५२,दि.१२.०३.२०२१, ९१४४, दि.१६.०३.२०२१, ९३११, दि.१८.०३.२०२१

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे ( मिशन बिगिन अगेन ) संदर्भात कोविड – १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका क्षेत्रामध्ये** कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे **होळी / धूलिवंदन किंवा रंगपंचमी सण / उत्सव** साजरा करणेकरिता सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

- पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड – १९ च्या पुन:श्च होऊ लागलेल्या मोठ्या प्रमाणावरील प्रादुर्भाव या पार्श्वभूमीवर खबरदारीची उपाययोजन म्हणून गर्दी टाळण्यासाठी दिनांक २८/०३/२०२१ रोजी साजरा होणारा होळी सण तसेच दिनांक २९/०३/२०२१ रोजीचा धूलिवंदन किंवा रंगपंचमी सण / उत्सव सार्वजनिक ठिकाणे, हॉटेल्स,रिसॉर्ट, सार्वजनिक सभागृहे, सार्वजनिक व खाजगी मोकळया जागा, सर्व गृहनिर्माण संस्थामधील मोकळया जागा, रस्ते, मैदाने, गार्डन, शाळा इ. ठिकाणी खाजगी व सार्वजनिकरित्या साजरा करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. तसेच ' मी जबाबदार ' मोहिमेअंतर्गत वैयक्तिकरित्या सुद्धा शक्यतो हा उस्तव साजरा करणे टाळावे.

सदर मनाई आदेशाचे पालन करून नागरिकांनी महापालिका प्रशासनास सहकार्य करावे ही विनंती. सदर आदेशामधील कोणत्याही तरतुदीचा भंग केल्यास संबंधितांविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व कायद्यातील इतर तरतुदीनुसार कारवाई करणेत येईल.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. २४.०३.२०२१ रोजी दिलेला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन स्थापना-१९५० EST.1950

स्वाक्षरी/xxx
( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

निर्गमित
Rubal 24/3/21
(रूबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका